**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-II FEBRUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# मराठा समाजातील विधवा पुनर्विवाह विषयक सद्यस्थिती

**श्री शिवाजी दत्तू आसाबे**
(संशोधक विद्यार्थी)
समाजकार्य विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद.

**प्रस्तावना -**

जातीव्यवस्था ही हिंदू समाजाचे एक महत्वाचे वैशिष्टये होय . परंतू केवळ हिंदू समाजावरच नव्हे तर जाती व्यवस्था सैध्दांतिकदृष्ट्या न मानणाऱ्या भारतातही तिचा प्रभाव पडलेला आहे. म्हणजे इतर धार्मिक समुहात जातीसारखी बंद व्यवस्था निर्माण झाली आणि म्हणुन जाती व्यवस्था ही परंपरागत भारतीय समाजाचे व्यवच्छेदक लक्षण बनले आहे. कोणत्याही समजातील स्त्रियांच्या दर्जाचे स्वरूप त्या त्या समाजाच्या विशिष्ट चौकटीवरून ठरत असते. त्या समाजातील चौकटी जातीय वैशिष्टये, सांस्कृतिक घडामोडी, धार्मिक रूढी परंपरा, कुटूंबातील व्यक्तीचे एकमेकांशी असणारे व बदलानारे नाते यावरून ठरत असते. स्त्री जन्मावर महत्वपुर्ण असा प्रभाव टाकणाऱ्या ज्या संस्था आहेत. त्यामध्ये कुटूंब, नातेसंबंध, विवाहसंस्था, वंशवारसा व्यवस्था आणि धार्मिक रूढी परंपरा जाती वर्गव्यवस्था यांचा समावेश होतो. थोर विचारवंत तथा समाजशास्त्रज्ञ मेल्वीन ट्यूमीन यांच्या मते,कोणत्याही समाजाचे प्रतिबिंब त्या समाजात प्रचलित असलेल्या सामाजिक स्तरीकरणात उमटलेले असते. मराठा समाजाचा विचार केल्यास सामाजिक स्तरिकरण हे 'मराठा' या नावावरूनच लक्षात येते. याचे पहिले वैशिष्टये म्हणजे लिंग, वय नाते संबंध यांच्यातील विषम स्तरावरील श्रेणी रचना होय. या वैशिष्टयात मराठा स्त्रियांचे स्थान स्पष्ट होतांना दिसते. या समाजातील स्त्रियांचे अधिकार व कर्तव्य विषम स्वरूपाचे असतात. यावर अधिस्तता पुरूषांची असते. मराठा समाजामध्ये स्त्रीयांना अधिकार या पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये प्राप्त होऊ शकत नाही. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत शैक्षणिक प्रगती शहरीकरण, राहणीमान, वाढती लोकसंख्या यामुळे मराठा समाजाच्या वर्तनप्रमाणकात बदल घडुन येत नाहीत. मराठा समाज हा जुन्या रूढी परंपरा यांना घट्ट धरूण आहे. मराठा समाजातील स्त्रीयांच्या वाट्याला त्या रूढी चक्रामध्ये मनाविरूध्द अडकुन पडणे येते. कारण त्यांच्या आवतीभवती आधुनीकीकरणाचे वारे पोहचलेले दिसत नाहीत.

ताराबाई शिंदे यांच्या मते, विधवा पुनर्विवाह ब्राम्हणात होत नाही असे काही नाही. दुसरे आवांतर पुष्कळ प्रभु, शेणवी, गुजराती, माटे, मारवाडी, मल्हाटे, देसाई, देशमुख, इनामदार, जहागिरदार, शिर्के, महाडिक, जाधव, भोसले, माने असे अनेक आडनांवाचे सोलापुर, सातारा,पुणे, ग्वाल्हेर, इंदौर या प्रातांत असे मऱ्हाठेशाहीला मानतात. त्यांच्या कुळात तर ब्राम्हणांपेक्षा पुनर्विवाह न करण्याची सक्ती दिसून येते. या लोकांचे घराण्यात तर प्राणांती असे होणार नाही, अशा उठून तर जाऊ देतील परंतु पुन्हा दुसरा नवरा कधीच करू देणार नाही. जुन्या रूढी, परंपरा यांना मराठा समाज घट्ट बांधून आहे. मराठा कुटूंबातील स्त्रीयांच्या वाट्याला त्या रूढीच्या प्रमाणे मनाविरूध्द अडकून पडणे हेच जीवन त्यांच्या वाट्याला आलेले आहे. कारण अवतीभवती आधुनिकीकरणाचे वारे त्यांच्यापर्यंत पोहोचलेले नाही. महाराष्ट्र राज्यात पाटील, देशमुख, कुणबी मराठा जातीत पोटभेद पडतात. मराठा समाजातील कुणबी, पाटील, देशमुख, हे फरक आर्थिक सुबत्तेबरोबरच कमी होवू लागले आहेत. परंतु हा फरक होताना देशमुख, कुणबी होतात व कुणबी पाटील होतात असे घडत नाही व पाटील देशमुखांच्या चालीरिती स्विकारतात. असे बाबा आढावांच्या मते सांगता येईल.

**संशोधनाचे विषयाचे महत्व :**

पितृसत्ताक कुटूंबपध्दतीमुळे, मराठा स्त्रियांना कायमच दास्यत्व व दुय्यम प्राप्त झाले आहे. त्यामुळे तथाकथित सामाजिक व्यवस्थेमध्ये मराठा समाज उच्चवर्णीय मानला गेला असला तरी मराठा समाजातील स्त्रियांची स्थिती अत्यंत दुय्यम आणि दुर्लक्षित आहे. त्यामुळे त्यांच्यावर अत्याचार व शोषणाला पुरूष वर्गाकडून त्यांना सामोरे जावे लागते. स्त्रियांचा दर्जास्थान व शोषण या दृष्टिने संशोधकाला व घटाकाचे संशोधन होणे महत्वाचे वाटते.

**संशोधनाचे उद्देश -**

१) विधवा -पूर्नविवाह-विवाह बंदी याची ऐतिहासिक पार्श्वभुमी जाणून घेणे.

२) मराठा समाजातील विधवा पुर्नविवाह विषयक सद्यस्थिती व त्याबद्दलचे मत जाणून घेणे.

**संशोधनाचे गृहितके -**

१) मराठा समाजामध्ये रूढी, परंपरांच्या नावाखाली विधवा पुर्नविवाहला मोठ्या प्रमाणात सामाजिक बंदी दिसून येते.

**संशोधन पध्दती -**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मराठा समाजातील विधवा पुर्नविवाह विषयक सध्यस्थिती जाणुन घेण्यासाठी ज्या संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्याबाबतचे विवेचन पुढील प्रमाणे -

**संशोधनाची व्याप्ती :**

सदरील संशोधनाच्या अध्ययनासाठी जालना जिल्ह्यातील बदनापुर तालुक्यामध्ये चिखली, तुपेवाडी, खादगांव, या तीन गावांची निवड करण्यात आली आहे. या निवडलेल्या प्रत्येक गावांतून ५ मराठा कुटुंब अशा एकुण १५ मराठा कुटुंबाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाचा आराखडा :**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे. या आराखड्यात संशोधन विषयाच्या खोलवर जाऊन अभ्यास करण्यात आलेला आहे. मराठा समाजाच्या कुटूंबामधील विधवा पुर्नविवाह विषयक सद्यस्थितीचे वर्णनात्मक विश्लेषण करण्यात येणार आहे.

**नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनामध्ये मराठा समाजातील विधवा पुर्नविवाह विषयक सध्यस्थितीचे अध्ययन करण्यासाठी जालना जिल्ह्यातील बदनापुर तालुक्यामधील चिखली, तुपेवाडी, खादगांव, या ३ गावांची गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील संहेतुक नमुना निवड पध्दतीने निवड करण्यात आली आहे. प्रत्येक गावातून ५ नमुन्यांची निवड यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने करण्यात आली आहे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत संशोधनमध्ये संशोधकाने तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत या दोन्ही स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये मुलाखत- अनुसूची, मुक्तचर्चा तसेच निरीक्षण इत्यादी पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. तर दुय्यम स्त्रोतांचा वापर हा मराठा समाजाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अध्ययन करण्यासाठी केला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा :**

सदरील संशोधन कार्यात मराठा समाजातील विधवा पुर्नविवाह विषयक सद्यस्थितीचे अध्ययन करण्यात आलेले आहे. मराठा समाज म्हणजेच मराठा जात (कुणबी, पाटील व देशमुख) असा अर्थ या संशोधनासाठी गृहित धरण्यात आलेला आहे.

**विधवा -विवाह बंदी व पुनर्विवाह ऐतिहासिक मागोवा व सध्यस्थिती :**

१९ व्या शतकात बालविवाहनंतर वैधव्य हा फार गंभीर प्रश्न बनला होता. स्त्रियांची बाबतीत हा एक शापच ठरला होता. बाल-जरठ विवाहामुळे विधवांचे प्रमाण वाढत होते. हा पुरूषप्रधानतेचा दोष असूनही समाज स्त्रियांना नावे ठेवत होता. त्यांना तो अपशकुनी समजु लागला. विधवा झाल्यांनतर सासु, सासरे, जावा-दीर व इतर नातेवाईक त्यांना करंटी आवदासा, अशा वेगवेगळ्या

www.aiirjournal.com

अपशब्दांनी घायाळ त्यांना करीत असत. माहेरची दारे त्यांच्यासाठी कायमची बंद होती. विधवा स्त्री आपल्या आई-बापाच्याही डोळ्यात सले. नवऱ्याऐवजी ही अवदसा मेली असती तर आपली दुसरी मुलगी त्या विधुराला दिली असती' अशा विचित्र शब्दांचा वर्षाव तिच्यावर होई.

अशा कोडींत सापडलेल्या विधवांना कोणाचाही आश्रय नव्हता. त्यांच्या जीवनातुन सुख, आनंद क्षितिजापलीकडे गेले होते. त्यांनी आयुष्यभर व्रतवैकल्ये व उपासतापास करण्यात दिवस काढावे. असे हिंदू धर्माप्रमाणे आज्ञा होती. विधवांना अत्यंत कमीपणा आणणाऱ्या आणि अतिशय अडचणीत आणणाऱ्या रूढी परंपरा होत्या. विधवांनी चोळी घालू नये, केशवपन करावे, सौभाग्य-अलंकाराचा त्याग करावा, रंगीत कपडे घालु नयेत.

तरूण विधवांचे प्रमाण त्या काळी अधिक होते. पुनर्विवाह करण्यावर बंदी होती. कुटूंबात त्यांचा मानसिक शारिरीक व लैंगिक छळ होत असे. बालविधवांचा प्रश्न मोठा कठीन बनला होता. त्या वयात आल्यानंतर कोणत्याही सामान्य मानसाप्रमाणे त्यांच्यामध्ये कामभावना निर्माण होणे साहजिक होते. त्या गरोदर राहिल्या की, पंढरपुर सारख्या क्षेत्राच्या ठिकाणी जात असत. तिथे असंख्य विधवा रस्त्यातून, नदीकाठी, देवळात मुक्तपणे हिंडत-फिरत असत. त्या गर्भपात करून घेण्याकरीता जात किंवा लालशंकर उमियाशंकर यांनी स्थापन केलेल्या आश्रमात जाऊन बाळंतपण करून, मुलाला तिथेच माघारी ठेवून पुन्हा आपआपल्या घरी जात. विधवांचा पुर्नविवाहास बंदी असल्यामुळे विधवांना पुन्हा लग्न करता येत नाही. परंतु निसर्गनियमानुसार त्या तारूणसुलभ भावनांना बळी पडतांना दिसतात. त्यातूनच भ्रूणहत्या होत असे. भ्रुणहत्या करणे न जमल्यास त्या एकतर आत्महत्या करीत किंवा कधीकधी घरातील पुरूष या विधवा मुलींना एखाद्या वेश्येला विकत. त्या काळात भ्रुणहत्या करणे हा एक गुंन्हा समजला जात असे आणि विधवा बाई गरोदर राहिली की ती पापी म्हणून तिला समाज वाळीत टाकीत असे. भ्रुणहत्या, बालहत्या हा गुन्हा मानला गेल्याने तिच्यावर रीतसर खटला भरला जात असे. विजयालक्ष्मी नावाच्या एका स्त्रीवरचा असा खटला १८८१ मध्ये बराच गाजलेला होता. तिला पाच वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा कायम झाली. अशी ही विधवा स्त्रियांची आगतिकता उच्चवर्णीय स्त्रियांमध्ये जास्त होती. कारण पुर्नविवाहास बंदी ब्राम्हण, क्षत्रिय, प्रभू, कायस्थ यांच्यामध्येच होती. या असहाय्य विधवांचा मायाळूपणे, माणुसकीच्या नात्याने महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्रथम विचार केला त्यांनी १८६८ मध्ये पुण्यात गंज पेठेतील आपल्या स्वतःच्या घरात 'बालहत्या प्रतिबंध गृह' स्थापन केले. कोणत्याही विधवेने तिथे जाऊन सुरक्षितपणे प्रसुती होण्याची सोय महात्मा फुले यांनी केली होती. याबबात पूर्ण गुप्तता राखण्यात आली होती. ही माहिती देणाऱ्या भित्तीपत्रकामध्ये असा उल्लेख होता की, 'विधवानो, इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मुले न्यावे किंवा येथेच ठेवावे. हे तुमच्या स्वतःहावर अवलंबुन राहील. त्या मुलांची काळजी हा अनाथाश्रम घेईल. महात्मा फुलेंच्या मते विधवांना पुर्नविवाहाची बंदी असल्यामुळे त्यांच्या हातुन व्यभिचार होऊन त्या गर्भपात करतात. विधवा स्त्रियांच्या अगतिकतेला, असहाय्यतेला ब्राम्हणी हिंदू धर्म आणि ब्राम्हणी पुरूषसत्ताक व्यवस्था जबाबदार आहेत. हिंदू धर्मातील कडक नियम पुरूषसत्ताक व्यवस्थेमुळे आणखी जाचक करून ते स्त्रियांवर लादले गेले. स्वतःची सत्ता जात व्यवस्था जपण्यासाठी विधवा स्त्रियांवर आणखी बंधने घातली. त्यांच्या लैगिंकतेवर नियंत्रण ठेवुन पुरूषप्रधान समाजाने आपली सत्ता अबाधित ठेवली.

१९ व्या शककात ब्राम्हण जातीत विधवाविवाहबंदी होती. इतर जातींमध्ये विधवाविवाह केली जात असे, पण आपली जात उच्च आहे हे दाखविण्यासाठी खालच्या जातींनीही विधवाविवाहावर बंदी घातली.

हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेची पदसोपानरचना व कर्मकांडावर उभ्या असलेल्या ब्राम्हणी हिंदू धर्मामुळे विधवाविवाहाला बंदी होती. तरीही खालच्या जातींतील लोक विधवांचे लग्न लावीत. त्याला माहोत्तर किंवा पाट लावणे असे म्हणत. पण ब्राम्हणी हिंदू धर्मात याला गौण स्थान होते. 'अशा लग्नाचा विधी दिवसा होत नसे, अंधाऱ्या रात्री होई. त्यावेळचे मंत्रपठणही नेहमीच्या विवाहातल्याप्रमाणे नसे, तर मंत्र उलटे म्हणावयाचे असत. हे कूटूंबवत्सलाने ऐकणे अशुभ समजले जाई. अशा तऱ्हेच्या विवाहात विधुर, म्हातारे, विधवाचे जमत. या सर्व प्रकारामुळे ही पध्दत व ते करणारा समाज गौण समजला गेला. समाज अप्रतिष्ठित ठरवला गेला. आपल्यालाही प्रतिष्ठा मिळावी यासाठी या समाजांनीही विधवा-विवाहास बंदी घातली.

**नमुना मराठा कुटुंबातील विधवा पुनर्विवाह विषयक सद्यस्थिती :-**

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | तपशील | पाटील | देशमुख | कुणबी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मान्यता आहे. | -- | -- | ५ | ५ (३३.३३ टक्के) |
| २ | मान्यता नाही. | ५ | ५ | -- | १०(६६.६७टक्के) |
| | **एकुण** | **५** | **५** | **५** | **१५ (१०० टक्के)** |

**स्त्रोत : प्रत्यक्ष नमुना पाहणी**

वरील तक्ता क्र. १ वरुन असे दिसून येते की, नमुना १५ कुटूंबातील ०५ कुणबी उत्तरदात्यांनी त्यांच्या मते विधवा पुनर्विवाह झाल्याचे सांगितले. म्हणजेच मान्यता असल्याचे दिसुन आले. तर उर्वरित देशमुख व पाटील या गटातील १० उत्तरदात्यांनी त्यांच्यामते असे विधवा पुनर्विवाह न झाल्याचे सांगितले. म्हणजेच विधवा पुनर्विवाहाला मान्यता नसल्याचे दिसुन आले. थोडक्यात मराठा समाजामध्ये नमुना १० (६६.६७ टक्के) विधवा विवाहाला मान्यता नसल्याने असे स्पष्ट होते की, ही संख्या नमुना कुटूंबाचे प्रमाण निम्या पेक्षा अधिक आहे.

**नमुना मराठा कुटुंबातील विधवा पुनर्विवाह विषयक सद्यस्थिती :-**

**तक्ता क्र. २**

| अ.क्र. | तपशील | पाटील | देशमुख | कुणबी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | समर्थन असणारे | -- | -- | ५ | ५ (३३.३३ टक्के) |
| २ | समर्थन नसणारे | ५ | ५ | -- | १०(६६.६७टक्के) |
| | **एकुण** | **५** | **५** | **५** | **१५ (१०० टक्के)** |

**स्त्रोत : प्रत्यक्ष नमुना पाहणी**

वरील तक्ता क्र. २ नुसार असे दिसून येते की, नमुना १५ कुटूंबापैकी ०५ कुणबी उत्तरदात्यांनी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले आहे. तर उर्वरित १० म्हणजे देशमुख व पाटील यांनी त्यांच्या मध्ये असे विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले नाही.

थोडक्यात, मराठा समाजामध्ये नमुना १० (६६.६७ टक्के) विधवा विवाहाला समर्थन देत नसल्याचे दिसुन येते. तथाकतिथ उच्च मराठा समाजातिल पोटभेदामधील पाटील व देशमुख यांच्या सामाजिक रूढी व परंपरा पाळल्या जात असल्याचे दिसुन येते. तसेच या पोटभेदामध्ये स्रियांवर खुप बंधने आहेत. परंतु तुनलेने कमी असलेला कुणबी या पोटभेदामध्ये विधवा पुनर्विवाह बंदीच्या बाबतीत पारंपारीकतेला रूढीवादाला छेद दिल्याचे आढळून येते.

**निष्कर्ष :-**

मराठा समाजातिल देशमुख व पाटील या उच्चवर्णियांमध्ये विधवा पुनर्विवाहास आजिबात मान्यता नसुन, रूढीवादी व पुरूषप्रधान संस्कृतीचा यांच्यामध्ये प्रभाव दिसुन येतो. तर या पोटभेदामध्ये तुलनेने दुय्यम स्थान असलेला कुणबी समाजामध्ये पांरपारीकतेला छेद दिल्याचे आढळुन येते.

**सूचना/ शिफारशी -**

मराठा समाजाने कोणत्याही प्रकारचे पोट भेद न पाळता उच्च, निच्च हा एकमेकांना दिलेला दर्जा या सर्व बाबींना मागे टाकुन एकजुटीने समाजातील धार्मिक, रूढी परंपरांना छेद देऊन एक नवा आधुनिक समाज निर्माण करावा.मराठा समाजाने विधवा पुर्नविवावह एक काळाजी गरज ओळखुन सरसगट मान्यता द्यावी.

**संदर्भसूची :-**

१. आढावा, प्रेमा., मराठा स्त्रीची घुसमट, मराठा हितमार्ग, १ सप्टेंबर २०००
२. इंगोले, प्रतिमा., 'मराठा स्त्रीयांचे प्रश्न मराठा हितमार्ग, १ सप्टेंबर २०००
३. लोमटे शर्मिष्ठा.,' मराठा समाज आणि स्त्रियांचे प्रश्न, बायजा- मराठवाड्यातील स्त्री विशेषांक, २००१
४. प्रा. सुमंत यशवंत, महाराष्ट्रातील जातीसंस्थात्मक विचार, प्रतिमा प्रकाशन , पुणे, १९८८.
५. डॉ. देशपांडे वी.वी., प्रा. बर्दापूरकर मोरेश्वर, भारतीय सामाजिक संरचना, विदया बुक पब्लिशियर्स, औरंगाबाद, १९९८.
६. प्रा. घाटोळे रा.ना., भारतीय समाज व्यवस्था, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर , २००२.
७. प्रा. मेश्राम सुरेश, प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, यश प्रकाशन, नागपूर,२००८.
८. जगताप राम , धसकटे सुशील, मराठा समाज वास्तव आणि अपेक्षा, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१२.
९. डॉ. कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, देशमुख अंड कंपनी, पुणे, १९६२.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com